“लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, आर्थिक व सामाजिक घटकाचा त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परिणाम - एक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

-: संशोधक :-

लखमावाड स्मिता रामलू

मार्गदर्शक

डॉ.अशोक पांडुरंगराव गिनगिने

एम.एस्सी,एम.एड, सेट,नेट,एम.फिल.

पीएच.डी. (शिक्षणशास्त्र, वनस्पतीशास्त्र)

सहा.प्राध्यापक

अभ्यास केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल,

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

सन -2022

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शीर्षक :-

“लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, आर्थिक व सामाजिक घटकाचा त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परिणाम - एक अभ्यास”

संशोधकाचे नांव	:	**लखमावाड स्मिता रामलू**
मोबाईल क्रमांक	:	9860913424
ईमेल आयडी	:	smitalakhmawad@gmail.com
प्रवर्ग	:	ST
विषय	:-	**शिक्षणशास्त्र**
मार्गदर्शक	:-	**डॉ.अशोक पांडुरंगराव गिनगिने**
		मो.नं. 9822268485
संशोधनकेंद्र	:-	**शिक्षणशास्त्र संकुल,**
		स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

प्रस्तावना : (Introduction) :

शिक्षण मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा मुलभुत अधिकार आहे. शिक्षण ही आज परिस्थितीत व्यक्तीची चौथी महत्त्वाची गरज आहे. व्यक्ती अशिक्षित असेल तर त्याचे किती मोठे नुकसान होते हे महात्मा ज्योतिबा फुले यांनी पटवून सांगीतले आहे ते खालील प्रमाणे

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली,
नितीविना गती गेली, गतिविना वित्त गेले
वित्ताविना शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले"

भारत हा अत्यंत प्राचीन अशी संस्कृती लाभलेला देश आहे. भारताला 5000 वर्षाचा इतिहास आहे. भारतात शिक्षणाची सुरवात वैदिक काळापासून सुरू झाली. पण या काळामध्ये शिक्षण घेणारे हे मोजकेच होते.

भारतात शिक्षणाची खरी सुरवात ब्रिटीशांची राजवटीत सुरू झाली. ब्रिटीश राजवटीत मिशनरी लोकांनी आदिवासी समाजाला शिक्षण देण्याचे प्रयत्न केले.ब्रिटीशांनी आपली सत्ता सांभाळण्यासाठी कारकुनी वर्गाची आवश्यकता होती व त्यासाठी त्यांनी त्या स्वरुपाचे शिक्षण देण्यास सुरूवात केली.

महात्मा ज्योतीराव फुले आणि सावित्रीबाईने मुलींची पहिली शाळा 1948 साली पुणे येथे काढली. काही वर्षांनी 1953 साली अतिमागास व आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी देशातली पहिली शाळा पुण्यात काढली खऱ्या अर्थाने आदिवासींच्यापरिवर्तनाला येथुनच सुरवात झाली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातींच्या शिक्षणावर खऱ्या अर्थाने भर देण्यात आला. अनुसूचीत जमातींच्या शिक्षणाला महाराष्ट्रात 1 मे 1920 नंतर भरीव स्वरुपाची सुरूवात झाली. याच काळात अनेक स्वयंसेवी संस्थानी आदिवासी

विकासासाठी प्रयत्न केले. शासनातर्फे स्वातंत्र आदिवासी विकास मंत्रालय विभाग अस्तित्वात आला आहे.

ब्रिटिशकाळापासून ते स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ही अनेक योजना सुरू करून ही आदिवासी समाजातील शिक्षणाचे प्रमाण खुपच अल्प आहे. याचे मुख्य कारण हे आहे की, हा समाज दऱ्या खोऱ्यात राहत असून त्यांना या योजनांचा म्हणावा तेवढा फायदा झालेला नाही त्यामुळे त्यांचे शिक्षणातील प्रमाण कमी राहीले त्यातच त्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणी व समस्यांना सामोरे जावे लागते.

म्हणुनच प्रस्तुत संशोधन आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेताना कोणकोणत्या अडचणी व समस्या येतात याचा अभ्यास करण्याच्या प्रामाणिक हेतुने हे संशोधन हाती घेण्यात आले आहे.

संशोधन समस्या निवडीची गरज व महत्त्व (Importance of The Subject) :-

आज प्रत्येक देश आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास करण्यासाठी धडपडत आहे. देशाचा विकास करायचा असेल तर त्या देशातील समाजाचा विकास होणे आावश्यक आहे. समाजाचा विकास म्हणजेच व्यक्तीचा विकास होय. यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. त्यासाठी स्वतंत्र मानव संसाधन मंत्रालयाची स्थापना करण्यात आली आहे.

या अनुषंगाने आपल्या देशातील प्रचंड लोकसंख्येतील एक मोठा घटक शिक्षणापासून वंचीत आहे. त्यामध्ये आदिवासी जमात ही समाविष्ट आहे. केंद्र सराकर व राज्य सरकार आदिवासी समाजाच्या शिक्षणासाठी विविध योजना कार्यान्वित करीत आहे. तरी पण आदिवासी समाजातील लोकांचा अजुनही विकास झालेला नाही. या समाजाचे शिक्षणातील प्रमाण इतर समाजाच्या मानाने अत्यंत कमी आहे त्यामुळे हे संशोधन केले जात आहे.

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना इतक्या शैक्षणिक सोयी सुविधा सरकार पुरवत असुन सुद्धा त्यांचे शिक्षणाचे प्रमाण का अल्प आहे ? इतर समाजातील विद्यार्थ्यांप्रमाणे या समाजातील विद्यार्थ्यांनी सुद्धा शिक्षण घ्यावे व स्वत:चा समाजाचा आणि देशाचा विकास करावा. यासाठी त्यात शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे. शिक्षण घेत असताना त्यांना कोणकोणत्या समस्या येतात. त्याचा अभ्यास करण्यासाठी व त्या समस्या सोडवण्यासाठी ज्या काही उपाय योजना सुचवणे शक्य आहे. त्यासाठी हे संशोधन विषय निवडण्यात आलेला आहे.

1) **सामाजिक समस्या :-**

लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील आदिवासी जमातीमध्ये आजही अनेक अंधश्रद्धा प्रचलित आहेत. त्यामुळे अनेक अनर्‌थ घडून प्रगती खुंटली आहे. अंधश्रद्धा ही लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील आदिवासींच्या आर्थिक उन्नतीमधील प्रमुख अडसर आहे. भानामती, करणी, शकुन, अपशकुन,जादु-टोना, मंत्र-तंत्र विविध प्राणीमात्राचा बळी देणे इत्यादी सारख्या अनेक अंधश्रद्धा या भागात आढळून येतात या भागातील आदिवासी जमातीमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक असल्याचे दिसुन येते. त्याच प्रमाणे बालविवाह, आणि वधुमूल्य (हुंडापद्धती) या सारख्या सामाजिक समस्यांनी या भागातील आदिवासी ग्रस्त आहेत.

2) **आर्थिक समस्या :-**

आदिवासी जमातीच्या अनेक घरामध्ये दोन वेळसचे पोटभर जेवन मिळण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने काम करणे गरजेचे असते मुख्य या नैसर्गिक गरजेच्या पुर्ततेसाठी त्यांचे शिक्षणाकडे आपोआप दुर्लक्ष होते. शिक्षणाच्या अभावामुळे पालकांमध्ये बेरोजगारी चे प्रमाण जास्त असल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना आर्थिक समस्या जानवतात.

3) मानसिक आरोग्यविषयक समस्या :-

सकस आहाराची लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील आदिवासी जमातीमध्ये अनेक मानसिक आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. अस्वच्छ राहनीमान, शुद्ध पाण्याचा अभाव यामुळे कावीळ, नारु, कॉलरा यासारख्या संसर्गजन्य रोगांना या भागातील आदिवासी जमात नेहमीच बळी पडते. तसेच लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील आदिवासी जातीच्या बालकांमध्ये कुपोषणाची समस्या आढळते. आदिवासी क्षेत्रामध्ये कार्यकरणारे डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्याची अपूरी संख्या, अपूरी आरोग्य केंद्रे आणि आधुनिक वैद्यकीय मदतीस अंधश्रद्धेमुळे या भागातील आदिवासी जमातीकडून मिळणारा अपूरा प्रतिसाद यासारख्या अनेक प्रमुख कारणामुळे मानसिक आरोग्य व आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्याचे दिसुन येते.

आदिवासी जमातीच्या विकासाकरीता अनेक योजना राबवूनसुद्धा त्यांना पाहीजे त्या प्रमाणात विकास झालेला नाही. त्यामुळे लातुर बोर्ड क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या समस्यांचा मुळाशी जाऊन त्यांचे सखोल अध्ययन करणे गरजेचे आहे. याद्वारे समस्यांचा अभ्यास करुन त्याची कारणे व उपाययोजना शोधण्यासाठी आणि पासारण्या अनेक उपयुक्त बाबींचे सखोल अध्ययन करण्याकरीता प्रस्तुत विषयाची संशोधन कार्यासाठी निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Research) :

1) लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यविषसयी अभ्यास करणे.
2) लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

3) लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सामाजीक परिस्थितीचा अभ्यास करणे.
4) लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, आर्थिक परिस्थिती व सामाजीक घटक यांचा यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परीणाम अभ्यासणे.

संशोधनाची परिकल्पना :-

1) आदिवासी विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वातावरण शिक्षणास पोषक नाही.
2) आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम होतो.
3) आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोण उदासिनतेचा आहे.
4) आदिवासी समाजातील अजान, रुढी, परंपरांचा त्यांचा शिक्षणावर परिणाम होतो.

संशोधनाची गृहीतके :-

1) आदिवासीची कौंटुबिक आर्थिक परिस्थिती बिकट आहे.
2) आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शासन सर्वेतोपरी प्रयत्न करीत आहेत.
3) आदिवासी विद्यार्थ्यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन बदलत आहे.
4) आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण मोठे आहे.
5) इतर समाजाच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे.

अध्ययन क्षेत्र :-

प्रस्तुत संशोधनासाठी अध्ययन क्षेत्र म्हणून लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांचा मानसिक आरोग्य, आर्थिक व सामाजीक समस्यांचा सखोल अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाईल.

जनसंख्या नमुना निवड :-

प्रस्तुत संशोधनासाठी लातुरबोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांचा समावेश केला आहे. संशोधिकेने संशोधनासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीनुसार एकुण जनसंख्येतुन 10% न्यायदर्श घेतला आहे.

संशोधना पद्धती (Research Methodology) :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकीने सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

संशोधन साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी मानसिक आरोग्य, आर्थिक परिस्थिती, सामाजीक घटक या बाबत प्रमाणीत चाचणी यांचा वापर करण्यात येणार आहे.

प्रकरण योजना 1 ते 5 (सारांश) :-

कोणत्याही संशोधनाचा विषय निवडण्यापूर्वी त्या बद्दल वाचन करणे अत्यंत आवश्यक असते व त्यावरुन संशोधनाच्या विषयाची निश्चिती करणे सोपे जाते.

आदिवासी समाजाबद्दल वाचन करुन लातुर बोर्ड कार्यक्षेत्रातील उच्च माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, आर्थिक व सामाजीक घटकाचा त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीवर होणारा परिणाम एक अभ्यास.

ही संशोधन समस्या विधान घेतले.

1) **प्रकरण 1 ले :-**

या प्रकरणात समस्या, विधान, गरज व महत्त्व, संशोधनाची उदिष्ट्ये, संशोधनाची गृहीतके, व्याप्ती, मर्यादा, व व्याख्या संशोधनाची कार्यपद्धती यांची थोडक्यात माहीती आहे.

2) **प्रकरण 2 रे :**

या प्रकरणात संबंधित साहित्याचा संबंधित ग्रंथाचा आणि नियतकालीकांचा आढावा घेतला जाईल याची थोडक्यात माहीती देण्यात आली आहे.

3) **प्रकरण 3 रे :**

या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनाच्या कार्यपरिस्थितीची माहीती देण्यात येईल. प्रस्तुत संशोधनासाठी कोणतीही संशोधन पद्धती वापरली, न्यायदर्शकास निवडला, संशोधनाची साधने कोणती याचा उल्लेख केला जाईल.

4) **प्रकरण 4 थे :**

या प्रकरणामध्ये संकलीत माहितीचे प्रथ:करण व अर्थनिर्वचन केले जाईल. विद्यार्थ्यांसाठीच्या प्रश्नावलीनुसार पृथ:करण व उद्दिष्टानुसार पृथ:करण केले जाईल. व त्या पृथ:करणाचे अर्थनिर्वचन कसे केले याची थोडक्यात माहीती दिली जाईल.

5) **प्रकरण 5 वे :-**

या प्रकरणात निष्कर्ष व शिफारशी यांची थोडक्यात माहिती दिली जाईल. तसेच पुढील संशोधनासाठी विषय सुचविले जाईल.

संदर्भग्रंथ सुची :-

1) साळुंके संजय : आदिवासी समाजशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

2) गोरे गोविंद : (1993), भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन, औरंगाबाद.

3) काळदाते सुधा : भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, विद्या बुक्स पब्लिकेशर्स, औरंगाबाद.

4) नाडगोंडे गुरुनाथ : भारतीय आदिवासी कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे.

5) देशमुख सुदर्शन : आदिवासी समाजाचे दारिद्र्य, निर्मल प्रकाशन, नांदेड.

6) साळुंके संजय, गोंड, संवेदन प्रकाशन, औरंगाबाद.

7) गायकवाड एस.पी.मुख्य सामाजिक संस्था आणि समस्या, अरुणा प्रकाशन, लातुर.

8) घाटगे जयंत : समकालील भारतातील सामाजिक समस्या, सकाळ प्रिटींग प्रेस, कोल्हापूर.

9) आगलावे प्रदिप : संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नांदेड.

10) बोधनकर सुधीर व इतर : सामाजिक संशोधन पद्धती ; श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

मार्गदर्शक

डॉ.ए.पी. गिनगिने
सहा. प्राध्यापक शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

संशोधिका

लखमावाड स्मिता रामलू
शिक्षणशास्त्र विभाग,
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड